# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 11/07/2020 (शनिवार)

(सकाळ)

---

### चोरी

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 04 कि. मी अंतरावर टेकाडी शिवार येथे दिनांक 09/07/2020 चे 15.00 वा. ते दिनांक 10/07/2020 चे 10.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुहाश रामकृष्ण मोदुरके, वय 31 वर्ष, रा. टेकाडी कन्हान यांच्या शेतात धाणसाठी लागनारे लक्ष्मी हायबीज कंपनीचे संजीवनी कंपनीचे गोदावरी सुपर दानेदार गॅनुलर संजीवनी गोदावरी पोटॅश युरीया इफको कंपनीचे साल्फेट 29 बोऱ्या किमती 29,000/–रू. तसेच गजानन सातपैसे यांचे 24 साल्फेटच्या बोऱ्या किमती 22,000/–रू. व सुर्यभान झीबल सातपैसे याच्या 21 साल्फेट बोरी किमती 16,000/–रू. असे एकत्र एकुन 74 बोऱ्या एकुन किमती 67,000/–रू. चा मुद्देमाल अज्ञात चोराने चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा कुरेशी 8390632202 हे करीत आहे.

### रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 04 किमी अंतरावर मौजा चौघान फाटा येथे दिनांक 10/07/2020 चे 00.40 वा. ते 01.30 वा. दरम्यान दरम्यान एमच–40/के–2438 क्रमांकाचा 10 चक्का ट्रक व एमच–40/बीजी–2172 क्रमांकाचा 10 चक्का ट्रकचे चालक व मालक आरोपी क्र– 1) रामरतन जिवन वर्मा, वय 32 वर्ष, रा. धनतेश्वर नगर वेस्ट हाय कोर्ट, नागपुर, 2) ईश्वर खेलु वर्मा, वय 32 वर्ष, रा. धनतेश्वर नगर वेस्ट हाय कोर्ट, नागपुर, 3) विकास जयराम पांडे, वय 24 वर्ष, रा. बेसा नागपुर व 4) दिपक तेजराम मानापुरे, वय 42 वर्ष, रा. मानापुर रोड, नागपुर यांनी संगनमत करून त्यांच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 4 ब्रास रेती किं. 12,000/–रू. रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण 40,24,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस शिपाई गोविंद खांडेकर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीतांविरुध्द कलम 379, 109 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि प्रमोद कोळेकर 9834323960 हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती मोनिका राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली पो.स्टे. रामटेकचे ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री. ठाकुर, सपोनि शेंडगे, पोउपनि प्रमोद कोळेकर, पोलीस शिपाई गोविंद खांडेकर, राजु भोयर, राजु पोले, शाबीर शेख यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.

## विनयभंग

पो.स्टे. खापरखेडा :– दि. 10/07/2020 चे 13:00 वा. ते 18.30 वा. चे सुमारास 22 वर्षीय पिडीत/फिर्यादी हि शिलाईचा सामान घेवुन घराकडे जात असतांना आरोपी नामे– रवि राजकुमार वैष्णव, वय 22 वर्ष, रा. वार्ड क्र. 1, चिचोली याने तिचा पाठलाग करून 'तु ऐकटी भेट असे' म्हणुन तिच्या मोबाईलवर आपला मोबाईल नंबर डॉयल करून संपर्क साधुन तिला लज्जास्पद केले. फिर्यादी हीने हि बाब भाउ याला सांगीतली असता आरोपीला समजाविण्यांसाठी त्याचा मित्र सोबत गेले असता आरोपीने त्याचे दुकानातील लाकडी दंडयानी फिर्यादीच्या भावाच्या मित्राचे डोक्यावर डावे बाजुला मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम 354(ड), 509, 324 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि धुमाळ 9970848688 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर